# यशोन्नती



१९७५ मधील वास्तू. गो. भा. भाटवडेकर (उजवीकडे)



नूतनीकरणानंतरची (लहान) नू.म.वि. प्रशालेसमोरची वास्तू

**मेसर्स दि. वा. भाटवडेकर**

माझे आजोबा कै. दिगंबर वामन भाटवडेकर. जन्म इ.स. १८८५, मु. पो. असोडे, तालुका लांजा, जिल्हा रत्नागिरी. पालीपासून अगदी जवळ, पण रस्त्यापासून खूप आत. त्यामुळे शिक्षण फार तर ४थी पर्यंत होते. शेती अगदी थोडी. त्यामुळे एकत्र कुटुंबात भागणे अवघड होते. म्हणून इ. स. १९०० च्या सुमारास घाटावर पोट भरण्याकरता गाव सोडले. सौ. गावाकडेच ठेवली होती. प्रथम श्री. थत्ते, ६१७ शनिवार पेठ (जुना) ह्यांच्याकडे घरकामास राहिलो. ह्यात देवपूजा व म्हशींच्या धाराकाढणे देखील होते. तरीदेखील पैसे साठत नव्हते आणि बायको तर आणावयाची होती. म्हणून लोकांच्या सल्ल्याने लक्ष्मी रोडवरील दाबके टेलर ह्यांच्याकडे शिवणकाम शिकण्यास सुरुवात केली. त्याच वेळी शेजारी ६१८ शनिवार पेठ ह्या गोडबोले ह्यांच्या वाड्यात जागा रिकाम्या होत्या आणि त्यांनीच आग्रह केला की, आमच्या वाड्यात दिवाबत्ती होईल. शिक्षण पूर्ण झाल्यावर एक जुने मशीन घेऊन छोटी-मोठी कामे सुरू केली. वाड्याचे मालक श्री. गोडबोले शर्ट शिवण्यास देत असत. एक दिवस, 'तुम्ही कापड का ठेवत नाही?' अशी विचारणा झाल्यावर कापड ठेवण्यास सुरुवात केली. त्या काळी प्रकारदेखील कमी होते आणि एकाच प्रकारच्या कापडाचे ६-६ शर्ट शिवत असत. हा काळ सन १९०५-१९०७ चा होता. माझी आजीदेखील तोपर्यंत पुण्यास आली होती.

माझ्या वडिलाचा जन्म १९१३ मधला. शिक्षण न्यू इंग्लिश स्कूलमध्ये सुरू होते. पण १९२८-३२ हा काळ महात्माजींच्या स्वातंत्र्य चळवळीचा होता, त्यामुळे शिक्षणाकडे दुर्लक्ष झाले आणि ११वी पास न होताच शाळा सोडली आणि वडिलांना दुकानात मदत करावयास सुरुवात केली. शिवणकाम देखील शिकून घेतले आणि त्या कामास सुरुवात केली. आता कापडाचा व्यवसायदेखील वाढला होता. सन १९४८ मध्ये त्या काळाचे प्रसिद्ध मिल 'बिन्नी'चे अधिकृत विक्रेते म्हणून नेमणूक झाली. तोपर्यंत आजोबा निवृत्त झाले होते. एकत्र कुटुंब असल्यामुळे सर्व कुटुंबखर्च दुकानावरच होता. त्यामुळे दुकानाचा आर्थिक पाया कधीच भक्कम होऊ शकला नाही. तरीदेखील घाऊक बाजार पेठेत आम्हाला मान होता- जरी पैसे द्यावयाला उशीर होत होता, तरी कारण बुडीत होण्याचा धोका नव्हता.

सन १९६६ मध्ये आजोबांचे वृद्धापकाळाने निधन झाले आणि माझ्या

**श्रावण मासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहिकडे,**
**श्री. विजय आंबर्डेकर, मुंबई - मो. ९८१९८८५६६५**

वडिलांच्या खांद्यावर धुरा आली. मधल्या काळात कौटुंबिक कलहामुळे खूपच आर्थिक हानी झाली; तरीदेखील दुकान बंद होऊ दिले नाही. अवघ्या दोनच वर्षांनी म्हणजे सन १९६८ मध्ये वडिलांचे अचानक निधन झाले आणि मोठा प्रश्न उभा राहिला. आम्ही ६ भावंडे होतो. शिक्षणे अपूर्ण होती. तरीदेखील माझे बंधू कै. श्री अनिल यांनी त्याग करून (बी. एस्सी. व मेडिकल रिप्रेझेंटेटिव्हची नोकरी सोडली) दुकानाची जबाबदारी स्वीकारली. मी बी. ई. असून तेव्हा बेकार होतो. पण मनाचा मोठेपणा दाखवून त्याने दुकान १४ जून २०१५ पर्यंत अगदी शेवटच्या श्वासापर्यंत सांभाळले.

एवढी मोठी ९९ वर्षांची वाटचाल सोपी नव्हती. आर्थिक अडचण असून देखील केवळ प्रामाणिकपणा, सचोटी, 'ग्राहको देवो भव' ही पॉलिसी अजून देखील चालू आहे. त्यामुळेच आमचे ग्राहकदेखील पिढीजात आहेत. शनिवार, नारायण, सदाशिव सोडून लांब राहावयास जाऊनदेखील आमच्याकडे खरेदी आवर्जून करतात. आजमितीस दुकान ही एक नुसती व्यापारी संस्था राहिली नसून, एक इन्स्टिट्यूशन झालेली आहे. लक्ष्मी रोडवरील भपकेबाज दुकानांपुढे आम्ही कदाचित अगदी मामुली असू; पण मराठी त्यातून ब्राह्मण असूनदेखील एकच व्यवसाय ३ पिढ्यांच्या पुढे नेऊन ठेवला, ही माझ्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. आता चौथ्या पिढीतील माझा पुतण्या श्री. परितोषदेखील माझ्याबरोबरीने व्यवसायात आहे. पुढील वर्षी १० मे रोजी आमची १०० वर्षे पूर्ण होतील आणि नंतर १४ नोव्हेंबर २०१८ रोजी वडील निधनानंतर व्यवसाय ५० वर्षे चालू राहत आहे.

अनेक बऱ्या-वाईट परिस्थितीशी सामना करत आमच्या ३ पिढ्या मागे हटल्या नाहीत, ह्याबद्दल मी ईश्वराचा ऋणी आहे. त्याचबरोबर ज्या घाऊक पुरवठादारांनी आम्हाला सांभाळून घेऊन आमच्यावर कधीही अविश्वास दाखवला नाही आणि पिढ्यान्‌पिढ्या ज्या ग्राहकांनी आमची साथ सोडली नाही, त्यांचा शतशः आभारी आहे.

**गो. भा. भाटवडेकर**




***क्षणांत येते सर सर शिरवे क्षणांत फिरुनि ऊन पडे***

सौ. अंजली आंबर्डेकर, मुंबई – मो. ९८१९८८५६६५